**KHELO INDIA 2019** **02nd January 2019**

On 02nd January 2019 one of the member of National Service Scheme and student welfare unit of Zeal College of Engineering & Research had attended the event KHELO INDIA conducted by Government of India and Government of Maharashtra. Meeting was conducted on 02nd and 3rd January 2019. This event conducted between 08th January 2019 to 20th January 2019. This task was completed under the guidance of NSS officer Dr. Yogesh Sonawane & Prof. R.R.Buktae The event was successfully finished on 20th January 2019.




**Khelo India 2019 at Balewadi: 02ndJan 2019**

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच.डी.
संचालक

कार्यालय क्र. : ०२०–२५६९७३४१
०२०–२५६०११५३
फॅक्स क्र. : ०२०–२५६९७३४१
मोबाईल : ९८८१९०८०२०


रासेयो/३४२/२०१८ तातडीचे व अत्यंत महत्त्वाचे दि. ०३/१२/२०१८

प्रति,

मा. प्राचार्य व रासेयो कार्यक्रम अधिकारी

रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,

सोबत जोडलेल्या यादीनुसार

विषय : 'खेलो इंडिया युथ गेम्स : २०१९' मधील महाविद्यालयीन विद्यार्थी सहभाग

संदर्भ : १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासननिर्णय क्र. केआवपी–२३१८/प्र.क्र.१९७/
क्रीयुसे–२, दि. ०६/१०२०१८

२. खेलो इंडिया क्रीस्पर्धा दि. १२/११/२०१८

महोदय,

केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने द्वितीय खेलो इंडिया युथ गेम्स, २०१९ शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, पुणे येथे दि. ८ ते २० जानेवारी, २०१९ या कालावधीत आयोजित करण्याचे निश्चित झालेले आहे. खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत १८ खेळांच्या स्पर्धा १७ वर्षाखालील व २१ वर्षाखालील मुले व मुली या गटात होणार असून सुमारे १२,५०० खेळाडू, तांत्रिक अधिकारी व स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

या स्पर्धेच्या नियोजनाकरिता स्वयंसेवक म्हणून आपल्या महाविद्यालयातील सोबतच्या यादीमध्ये नमुद केलेल्या विद्यार्थी संख्या सहभागी करून घ्यावी. याकरिता खाली नमूद केलेल्या संकेतस्थळावर सहभागी स्वयंसेवकांची नावनोंदणी दि. ६ डिसेंबर २०१८ पर्यंत करणे आवश्यक आहे. आयोजकांसमवेत झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार सहभागी स्वयंसेवकांना आयोजकांमार्फत दि. ८ ते २० जानेवारी २०१९ दरम्यान नाष्टा, भोजन व प्रत्येकी प्रतीदिन रू. २५० तसेच दोन टी-शर्ट व एक ट्रॅकसुट देण्यात येणार आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या बँक खात्याचे विवरण अत्यावश्यक आहे.

Online नावनोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची यादी दि. ५ डिसेंबर २०१८ पर्यंत रासेयो कार्यालयास nss_student_list@pun.unipune.ac.in या मेलवर Khelo India Youth Games Vol. List या विषयासह पाठवावी व या उपक्रमाच्या नियोजन बैठकीकरिता दि. ५ डिसेंबर २०१८ रोजी दु. ३.३० वा. सदर यादीसह रासेयो कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे उपस्थित रहावे. कळावे, ही विनंती.

सदर नियोजन बैठकीकरिताचा प्रवासखर्च नियमित कार्यक्रमातून करण्यात यावा.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

१. *नावनोंदणी लिंक :* https://kheloindia.sportz.io/volunteers/login
२. *लॉगीन :* SAVITRIBAI_vol , *पासवर्ड :* SAVITRIBAI_vol_123
३. *खेलो इंडिया माहितीपत्रक*
४. *सहभागी महाविद्यालयांची यादी*